# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

☏ कार्यालय - (०२३१) २६५३६३२, निवास - २६५३६३४, फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com

---

**रजिस्टर पोष्टाने**

विषय - वनरक्षक भरती प्रक्रिया २०१५.
शारिरीक मोजमापे, मूळ कागदपत्रांची तपासणी व चाल चाचणी (Walking Test) करीता उपस्थित राहणेबाबत.

क्रमांक -४-३/आस्था/वनरक्षक भरती/७५/२०१५-१६.
कोल्हापूर ४१६ ००३, दिनांक १ जून,२०१५.

प्रति,

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

दिनांक १७.११.२०१४ ते १९.११.२०१४ या कालावधीत पंचतारांकित एमआयडीसी कागल येथे उमेदवारांची वनरक्षक भरती प्रक्रियेकरीता शारिरीक क्षमता चाळणी चाचणी घेण्यात आलेली आहे.

आपण एमकेसीएल कडे ऑनलाईनद्वारे केलेल्या अर्जानुसार व त्या **अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रवर्गानुसार / समांतर आरक्षणानुसार आपले नांव प्राथमिक टप्प्यात लघुयादीमध्ये** समाविष्ठ करण्यात आलेले असून त्याबाबत एमकेसीएल चे संकेतस्थळावर लघुयादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी आपण **शारिरीक मोजमापे (वजन, छाती, उंची) व मूळ कागदपत्रांची तपासणी / चाल चाचणी (Walking Test) याकरीता सोबतचे कार्यक्रमाप्रमाणे व नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांसह या कार्यालयात दिनांक ११.६.२०१५ रोजी सकाळी ८.०० वाजता उपस्थित रहावे.**

आपण सदर दिवशी व वेळेत उपस्थित न राहिलेस आपले नाव भरती प्रक्रियेमधून वगळण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मु.व.सं.(प्रादे.) कोल्हापूर यांचे मान्यतेने**

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
कोल्हापूर.

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

☏ कार्यालय - (०२३१) २६५३६३२, निवास - २६५३६३४, फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com

---

**प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर वृत्त - वनरक्षक भरती प्रक्रिया २०१५**

## लघुयादीमधील उमेदवारांची शारिरीक मोजमापे, मूळ कागदपत्रांची तपासणी व चालणेचा चाचणीचा (Walking Test) कार्यक्रम.

प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर अंतर्गत वनरक्षक भरती प्रक्रिया २०१५ करीता उमेदवारांची शारिरीक क्षमता चाळणी चाचणी दिनांक १७.११.२०१४ ते १९.११.२०१४ या कालावधीमध्ये पंचतारांकित एमआयडीसी कागल येथे घेण्यात आली. या चाचणीमधून पुढील फेरी (उमेदवारांची शारिरीक मोजमापे, मूळ कागदपत्रांची तपासणी व चाल चाचणी) करीता पात्र झालेल्या उमेदवारांची यादी एमकेसीएल चे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. लघुयादीमधील उमेदवारांची

**वेळापत्रक**

**स्थळ :- मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, हेड पोस्ट ऑफिससमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर.**

| | |
|---|---|
| दिनांक ११.६.२०१५ रोजी सकाळी ८.०० वाजता | लघुयादीमधील उमेदवारांची वैद्यकीय अधिका-यांचे पथकामार्फत शारिरीक मोजमापे (वजन, छाती, उंची इ.) व मुळ कागदपत्रे तपासणी करणे |
| दिनांक १२.६.२०१५ रोजी सकाळी ७.०० वाजता | शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी यामध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची चाल चाचणी (Walking Test) पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. अंतर व महिला उमेदवारांना १६ कि.मी. अंतर चार तासात पार करणे<br><br>स्थळ - पंचतारांकित एमआयडीसी, कागल |

(कृपया मागे पहा)

## उमेदवारांना सूचना

१) लघुयादीमधील उमेदवारांनी शारिरीक मोजमापे, मूळ कागदपत्रांची तपासणी व चाल चाचणीकरीता वर नमूद दिनांकास व वेळेमध्ये वनवर्धन बिल्डींग, हेड पोस्ट ऑफिससमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर या ठिकाणी हजर रहावे.

२) नमूद वेळेपेक्षा उशीरा आल्यास संबंधीत उमेदवारास प्रवेश मिळणार नाही.

**३) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेली सर्व मूळ कागदपत्रे, दस्ताऐवज सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे सदर दस्ताऐवजाचा साक्षांकित केलेला एक संच सोबत आणावा.**

४)पदाकरीता आवश्यक शैक्षणिक पात्रता (इयत्ता १०/१२ वी) एकापेक्षा अधिक संधीमध्ये उत्तीर्ण असल्यास सर्व गुणपत्रिका सोबत आणणे आवश्यक आहे

५) उमेदवारांनी परीक्षा संबंधी गैरमार्गाचा अवलंब किंवा कोणताही दबाव आणल्यास संबंधितास निवड प्रक्रियेमधून अपात्र करण्यात येईल.

६) **मूळ कागदपत्रांचा तपशील**

(१) माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) प्रमाणपत्र (जन्मतारखेच्या पुराव्याकरीता)

(२) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र व गुणपत्रक (एखादा उमेदवार दोन अथवा तीन संधीमध्ये १२ वी उत्तीर्ण झालेला असेल तर सर्व मूळ गुणपत्रके सादर करणे बंधनकारक राहील.

(३)मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र)

(४)सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र.

**(५) निकटतम वर्षाचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले किमान दिनांक ३१.३.२०१४ अखेर वैध असलेले प्रमाणपत्र अथवा कमाल दिनांक ३१.३.२०१५ अखेर वैध असलेले प्रमाणपत्र)**. सदरचे प्रमाणपत्र विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग यांना आवश्यक आहे. तसेच खुल्या प्रवर्गामधील महिला उमेदवारांकरीता सुध्दा सदरचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(६) प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांना सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.

(७) होमगार्ड उमेदवारांकरीता सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र व तद्‌संबंधी सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक. सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणीचे वैध प्रमाणपत्र.

(८)"सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांकरीता तद्‌संबंधी सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.

(९)स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य असलेल्या उमेदवारांकरीता सक्षम प्राधिकारी यांचेकडील नामनिर्देशनाबाबतचे प्रमाणपत्र.

(१०)सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील उमेदवारांनी त्यांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र.

(११)माजी सैनिकांच्या बाबतीत एसएससी पास असलेचे प्रमाणपत्र आणि कमीत कमी १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्या जवळ सैन्य सेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे असे प्रमाणपत्र.

(१२)अति उच्च गुणवत्ता धारक खेळाडूंनी शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०.४.२००५ तसेच २०.९.२०१३ मधील तरतूदीनुसार विहीत असलेल्या मान्यताप्राप्त खेळासंबंधी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

(१३)रोजंदारी वनमजूरांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र.

(१४)एमकेसीएल कडे online सादर केलेल्या अर्जाची प्रत (संगणक Print)

(१५) उमेदवाराचे मूळ ओळखपत्र (उदा.आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, वाहन चालविणेचा परवाना, पॅन कार्ड यापैकी एक पुरावा) सोबत आणावे.

(एम.के.राव)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
कोल्हापूर